

# स्वच्छ किनारे, सुंदर शहर

**प्रथमेश दोंड,** पोदार कॉलेज
**muntainbox**@gmail.com



माटुंगा येथील **पोदार कॉलेजच्या** एनएसएस युनिटने 'माय ग्रीन सीटी' आणि एआयपीएमए संस्थेच्या सहकार्याने केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर' अभियानाचा एक भाग म्हणून दादर येथे स्वच्छता मोहीम राबवली. या मोहिमेला मुंबईतील कॉलेजांकडून उत्तम प्रतिसाद लाभतोय.

नुकताच गणेशोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी मोठ्या प्रमाणात पीओपीच्या मूर्ती समुद्रात विसर्जित करण्यात आल्या. केवळ मूर्तीच नाही तर निर्माल्य, प्लास्टिक आणि जलप्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टीसुद्धा समुद्रात सोडल्या गेल्या. या सगळ्या गोष्टी पुन्हा लाटांसह किनाऱ्यावर येतात. म्हणूनच आम्ही समुद्रकिनारे स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली, अशी माहिती एनएसएस युनिटची सदस्य ऐश्वर्या नाईकने दिली.

पोदार कॉलेजच्या एनएसएस युनिटच्या माध्यमातून दुर्गम भागात शाळकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचं वाटप करणं, पथनाट्य सादरीकरणातून अनेक विषयांवर भाष्य करत समाजात बदल घडवण्याचा प्रयत्न सुरू असतो. यासाठी विद्यार्थ्यांना कार्यक्रम अधिकारी विनिता पिंपळे, शिक्षक प्रमुख संजय ढगे या प्राध्यापकांसह कॉलेजच्या प्रिन्सिपल डॉ. शोबना वासुदेवन यांचं मोलाचं मार्गदर्शन लाभलं.